**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३००४ दि. १७/०९/२०१९**

# देशी बनावटीचे पिस्टल घेऊन फिरणारे इसम अटकेत
# वानवडी पोलीसांची कारवाई

दि.१६/०९/२०१९ रोजी वानवडी पोलीस ठाणे हद्दीत गंभीर गुन्हयांना प्रतिबंध व्हावा वाहनचोरी गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे स.पो.फौ.गुरव हे स्टाफसह १८.५० वा.चे सुमारास खाजगी वाहनांवरती पेट्रोलिंग करीत असताना ते फिरत फिरत भैरोबानाला चौक येथे आले असता पो.शि.७६३९ गोसावी यांना त्यांचे बातमीदाराने व त्यांनी आम्हाला कळविले की,रेसकोर्स जवळील पाण्याच्या टाकी जवळ वानवडी पुणे या ठिकाणी एक इसम निळसर रंगाची जिन्सची पॅन्ट व फिकट पिस्ता रंगाचे व काळया रंगाचे पटया पटयाचे डिझाईनचा शर्ट घालुन उभा असुन त्याच्याजवळ गावठी बनावटीचा कट्टा (पिस्टल) आहे. अशी बातमी खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर लागलीच सदरची बातमी सहा.पो.फौज प्रदिप गुरव यांनी फोनद्वारे मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.क्रांतीकुमार पाटील सो, यांना कळविली असता त्यांनी बातमीप्रमाणे खात्री करुन कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले. त्यानंतर सहा.पो.फौज प्रदिप गुरव यांनी दोन टीम तयार करुन दोन पंच यांना बोलावुन त्यांना बोलावण्याचा आशय संमजावुन सांगुन त्यांनी सहमती दर्शविल्याने त्यानंतर बातमीचे ठिकाणी पोहचुन दोन्ही टिम आपआपले ठिकाणी दबा धरुन थांबल्या व तेथे बातमीप्रमाणे वर्णनाचे इसमाचा शोध घेत असता तो रेसकोर्स पाण्याच्या टाकी खाली उभा असलेला दिसल्याने तसेच दोन्ही टिमची व पंचाची खात्री झाल्याने सपोफौ प्रदिप गुरव यांनी दोन्ही टिम मधील कर्मचा-यांना इशारा करताच दोन्ही टिम एकत्र जवळ येत अचानक संशयीत इसमावर झडप टाकुन त्यास १९.१० वा.चे सुमारास ताब्यात घेतले तसेच त्यास आम्ही पोलीस असल्याचे सांगुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव ऋषिकेश राजेंद्र चव्हाण वय २० वर्षे रा.मु.पो.गोपाळवाडी ता.दौंड जि.पुणे असे असल्याचे सांगितले त्याचे ताब्यात मिळुन आलेल्या मालाची पाहणी केली असता कि.रु ३५,०००/- चे एक देशी बनावटीचे पिस्टल व पिस्टलचे मॅगझीन मध्ये कि.रु २००/- चे ०१ पितळी काडतुसे असा एकुण कि.रु ३५,२००/-चा ऐवज जप्त पंचासमक्ष जप्त करून त्याचेकडे पिस्टल जवळ बाळगण्यासाठी सक्षम अधिकारी यांचे कडील परवाना आहे काय याबाबत विचारणा केली असता त्याने कसलाही परवाना नसल्याचे सांगितले.त्यानंतर वानवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सहा.पो.निरीक्षक श्री.चेतन मचले हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.श्री.सुनिल फुलारे सो,अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,मा.श्री सुहास बावचे सो,पोलीस उप-आयुक्त परि-५ पुणे शहर,मा.श्री.सुनिल कलगुटकर सो,सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे,श्री.क्रंातीकुमार पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सलीम चाऊस पोलीस निरीक्षक (गुन्हे),वानवडी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवालदार दत्तात्रय तेलंगे,पो.ना.गिरमकर,बोरावके,दुधाळ,गायकवाड,पो.शि.गोसावी यांचे पथकाने केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर**